साहित्य : समाज आणि प्रसार माध्यमे



संपादक

डॉ. प्रतिभा एस. जाधव

साहित्य : समाज आणि प्रसार माध्यमे

■ डॉ.प्रतिभा जाधव

■ प्रथम आवृत्ती दि. २७ फेब्रुवारी २०२३.

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.

हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,

वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती

मो. ९५९५५६०२७८

email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,

कठोरा रोड, अमरावती

■ Price : 300/-

ISBN - 978-93-95494-27-4

सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

अनुक्रमणिका

अ.क्र	लेख	लेखक	पु.क्र.
1	मराठी भाषा आणि प्रसार माध्यमे	डॉ. वैशाली जाधव	1
2	सोशल मिडिया आणि आजचा समाज	प्रा. सुपारे यु.पी.	5
3	प्रसारमाध्यमे जाहिरात आणि स्त्री प्रतिमा	प्रा.डॉ. सुरेखा सीताराम बनकर	13
4	मराठी भाषा आणि प्रसार माध्यमे	श्रीमती सुवर्णा विठ्ठल महाजन(सौ.सुवर्णा जितेंद्र पाटील)	20
5	साहित्य : समाज आणि माध्यमे	डॉ. अरविंद बा. पाटील	25
6	आदिवासी साहित्य और संचार माध्यम	डॉ. नलिनी तिलकर	31
7	साहित्य, समाज,सांस्कृती व माध्यमे सहसंबंध	प्रा. डॉ. संभाजी आण्णू शिंदे	38
8	भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील निवडक मराठी कविता	प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम	61
9	समाज माध्यमे: प्रभाव आणि उणिवा	डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे	69
10	प्रसार माध्यमे आणि इतिहास	प्रा.कु.छाया पांडुरंग ढाकुलकार	75
11	जनसंवाद व प्रसार माध्यमे	सुनिता रामराव गायकवाड	81
12	महिला आणि प्रसार माध्यमे	गायत्री गुरव	86

13	वृत्तपत्रीय भाषिक विशेष	डॉ. सर्जेराव पद्माकर	92
14	साहित्य व समाज परस्परांचे प्रतिबिंब	सतिश सुदाम कांबळे	99
15	प्रसारमाध्यमांचा समाजावरील प्रभाव	अभिनव सिताराम काटकर	102
16	स्त्रिया आणि प्रसारमाध्यमे	प्रा.अंजली राठोड श्रीवास्तव	111
17	प्रसार माध्यमांच्या कल्पक,सर्जनात्मक वापराची फलश्रुती - संपादक वीरभद्र मिरेवाड यांचा शालेय नावीन्यपूर्ण उपक्रम: कोरोना काळात: मुलांसाठी कविता'	शीलवंत भिवा वाढवे	120
18	जागतिकीकरण आणि आंबेडकरवादी साहित्य	संदीप गायकवाड	129
19	'जागतिकीकरणात साहित्य व माध्यमांचे स्थान'	प्रा.संदीप शिवाजी क्षीरसागर	137
20	ई-लर्निंग शिक्षणपद्धतीत प्रसार माध्यमांची भूमिका आणि रोजगाराच्या संधी	प्रा. डॉ. बाजीराव बी. आहिरे	143
21	साहित्य: समाज आणि प्रसारमाध्यमे	माधुरी मगर-काकडे	151
22	प्रसार माध्यम आणि समलिंगी	डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे	156
23	चि. त्र्यं खानोलकर यांच्या सगेसोयरे व अवध्य या नाट्याकृतींचा चिकित्सक अभ्यास	डॉ. निशा सु. जोशी	161

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील निवडक मराठी कविता

प्रा. डा□. चांगुणा विठ्ठल कदम

इतिहास विभाग बी. डी. काळे महाविद्यालय घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे.

पिन कोड - ४१२४०८

१७५७ च्या प्लासीच्या लढाईतील विजयाने ब्रिटिशांनी बंगाल प्रांतात सत्तेची मुहूर्तमेढ रोवली तर तिसऱ्या इंग्रज मराठा युद्धाने १८१८ मध्ये महाराष्ट्रात ब्रिटिश सत्तेची प्रस्थापना झाली. १७५७ ते १८५६ हा ईस्ट इंडिया कंपनीचा भारतातील सत्ताविस्ताराचा कालखंड होता. भारतात तसेच महाराष्ट्रात ब्रिटिशांच्या विविध अन्यायकारक धोरणांमुळे भारतीय जनतेत ब्रिटिश सत्तेविरुद्ध जी असंतोषाची भावना निर्माण झाली या भावनेचा उद्रेक म्हणजे १८५७ चा उठाव होय. इंग्रज राजवटीच्या आगमनानंतर ऐतदेशीयांचा काही काळ संभ्रमावस्थेत गेला. या संभ्रमावस्थेतून बाहेर पडल्यानंतर इथे आधुनिक विचारांना गती मिळाली. या आधुनिक विचारांबरोबरच आधुनिक मराठी साहित्य लेखनाला सुरुवात झाली. पाठ्यपुस्तके, भाषांतरे यापासून सुरू झालेला साहित्याचा प्रवाह पुढे निबंध, इतिहास, धर्म, तत्त्वज्ञान, भौतिकशास्त्रे, प्रवासवर्णने, राजकारण, चरित्रे, कथा, कविता, कादंबरी, नाटके अशी अनेक वाकवळणे घेत घेत विकसित झालेला दिसतो. या सर्व प्रकारांचा समावेश साहित्य या संकल्पनेत होतो. प्रस्तुत लेखात भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा प्रेरणाबिंदू असलेल्या निवडक मराठी कवितांचे वैचारिक योगदान अधोरेखित केलेले आहे.

भारतामध्ये ब्रिटिशांनी आपली सत्ता प्रस्थापित केल्यानंतर स्थानिक जनतेवर ब्रिटिशांच्या धोरणांचा जसा जुलूम, अत्याचार वाढू लागला, तसे देशभर त्या विरोधात आवाज उठण्यास सुरुवात झाली. बंगाल, बिहार, ओरिसा, तमिळनाडू, गुजरात, उत्तरप्रदेश या राज्यांमध्येही ब्रिटीश सत्तेविरोधी उठाव घडून आले. महाराष्ट्र तर यामध्ये आघाडीवरच होता. जमीनदार, शेतकरी, कारागीर, कलावंत, पत्रकार, साहित्यिक असे सर्वच वर्ग यात सहभागी झाले होते. या सर्व वर्गांमध्ये जागृती निर्माण करण्यामध्ये पत्रकार, साहित्य आणि कवींचा मोठा वाटा होता. भारताला स्वातंत्र्य मिळण्यासाठी अनेक वर्षे लढा सुरू होता. या लढाईमध्ये प्रत्येक भारतीय सहभागी झाला होता. आपापल्या परीने या लढाईत तो योगदान देत होता. यात सर्वात उल्लेखनीय योगदान दिले ते म्हणजे कवींनी. आपल्या कवितांमधून त्यांनी

व्यापक जनजागृती करण्यास सुरुवात केली. ब्रिटिश सत्तेविरोधात जनतेच्या मनात असंतोषाची भावना निर्माण करून राष्ट्रवादी भावना निर्माण करण्यात त्यांच्या साहित्याने मोलाचे योगदान दिले.

१८५७ च्या उठावात सहभागी असलेले कवी अजीबमुल्ला खान यांनी आपल्या कवितांमधून क्रांतीकारकांमध्ये प्रेरणा निर्माण केलेली होती.

"हम है इसके मालिक, हिंदुस्तान हमारा,

पाक वतन है कौम का, जन्नत से भी प्यारा।"१

या कवितेला भारताचे पहिले राष्ट्रगीत असेही संबोधण्यात आले होते. १८५७ च्या लढ्यात ही कविता क्रांतिकारकांचे क्रांतीगीत बनली होती. त्यानंतर स्वातंत्र्यलढ्याच्या टिळक युग आणि गांधीयुगात स्वातंत्र चळवळीला प्रेरणा देणाऱ्या अनेक कविता लिहिल्या गेल्या. सविनय कायदेभंग चळवळ, स्वदेशीचा स्वीकार, वहिष्कार, असहकार असे विषय कवितेचे विषय बनले. धर्म, जातीभेद बाजूला सारून सर्वांनी इंग्रजांविरोधात एकत्र यावे, देशासाठी लढणाऱ्यांचा क्रांतिकारकांचा गौरव करणाऱ्या कविता या काळात लिहिल्या गेल्या.

स्वातंत्र्यभावना जागविणाऱ्या मराठी कविता –स्वातंत्र्यभावना जागवणाऱ्या या लाटेत मराठी कविता आघाडीवर होती. मराठीतील राष्ट्रीय कवितेचे पहिले उदगाते असा ज्यांचा गौरव केला जातो ते कवी विनायक अर्थात विनायक जनार्दन करंदीकर यांच्या कवितेने या क्रांतीगीतांचा जणू पायाच घातला होता. आपल्या महाराष्ट्र लक्ष्मी या कवितेत ते म्हणतात,

'पूर्व दिव्य ज्यांचे, त्यांना रम्य भविष्यकाळ,

बोध हाच इतिहासाचा सदा सर्वकाळ,

कासया वाहावी चिंता मनी मग जहाल,

रात्र सरे तेव्हा उगवे दिनही पूर्ववाटे'.

याशिवाय लोकमान्य टिळकांचा कारावास, चाफेकर बंधूंची फाशीची शिक्षा, शिवजयंती, गणेशोत्सव, रशिया जपान युद्ध, जहाल मवाळ यांचा वाद या विषयांवरही त्यांनी कविता केल्या. त्यांनी हिरकणी, अहिल्या, पन्ना, राणी दुर्गावती, संयोगिता, तारा, पद्मिनी, कृष्णकुमारी, वीरमती आदी ऐतिहासिक स्त्रियांच्या जीवनातील प्रसंगांवर काव्ये लिहिली. त्यांनी आपल्या राष्ट्रीय कवितेतून पूर्वजांच्या पराक्रमाची गौरवगाथा वर्णन केली आहे.

महाराष्ट्राच्या तत्कालीन राजकीय जीवनाचे उध्वस्त स्वरूप कवी विनायकांनी वारंवार वर्णन करून दाखविले आहे. ही स्थिती अतिशय निराशाजनक होती. महाराष्ट्रीयन आपले पूर्ववैभव विसरून गेले होते. वैयक्तिक स्वार्थासाठी आपसात झुंजत होते. आत्मकल्याणाचा मार्ग नेमका चुकले होते आणि यापेक्षाही आत्यंतिक दु:खाची गोष्ट म्हणजे स्वत्व विसरून परांना वश झाले होते. वृत्तीच्या या करंटेपणा इतकेच सामाजिक जीवनाचे स्वरूपही कंगाल झाले होते."दारिद्र्य घरी जागते, अन्न काय ते दिसेना कुठे, किंवा ऐश्वर्य लयाला गेले, जडले दारिद्र्य कपाळी, असे उल्लेख विनायकांच्या कवितांत ठिकठिकाणी येतात. 'हतभगिनी' ही कविता तर या दुहेरी दु:स्थितीची साक्षात मूर्तीच होय. वर्तमानकाळाची ही अशी भग्न स्थिती चित्रित करणे हा विनायकांच्या राष्ट्रीय स्वरूपाच्या कवितेचा एक भाग होता."२ दिव्य भूतकाल आणि तुच्छ वर्तमानकाल यातील विरोध विनायकांना अत्यंत तीव्रतेने सलत होता.

याचप्रमाणे कवी भा.रा. तांबे यांनीही पारतंत्र्याविषयीची चीड आपल्या कवितेतून मांडली. 'रे हिंद बांधवा' या आपल्या कवितेतून ते, रे हिंद बांधवा, थांब या स्थळी अश्रू दोन ढाळी, ती परक्रमाची ज्योत मावळे इथे झाशीवाली, अशी १८५७ च्या उठावात पराक्रम गाजवलेल्या झाशीच्या राणीची आणि इतर वीरांची देशवासीयांना आठवण करून देतात. घटोत्कच माया, तरुणाचे पाते, अर्जी ऐका हो सरकार, साम्राज्यवादी मातृभूमीप्रत कोण रोधील? या त्यांच्या कविताही अशीच क्रांतीची गाणी गातात. प्रसिद्ध साहित्यिक, नाटककार आणि राम गणेश गडकरी यांनी आपल्या सर्व कलाकृतींमधून परकीय राजवटीच्या विरोधात समाजजागृती केली. ते गोविंदाग्रज या टोपण नावाने लिहीत. का□लेजमध्ये असताना त्यांनी पानपतचा फटका ही दीर्घ कविता लिहिली होती. स्वराज्याच्या मागणीसाठी लोकमान्य टिळक इंग्लंडला गेले तेव्हा गोविंदाग्रजांनी लोकमान्यांना उद्देशून 'भारत वर्षाचा आशिर्वाद' हे काव्य लिहिले होते. टिळक युगातील हे कवी. "मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा, प्रणाम घ्यावा माझा हा श्रीमहाराष्ट्र देशा। या महाराष्ट्र गीतातून त्यांनी मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत केला."३

याच दरम्यान स्वातंत्र्यवीर सावरकर क्रांतीकारकांच्या मनात स्फुल्लिंग चेतवणाऱ्या प्रेरणादायी कविता लिहीत होते. श्रीमंत सवाई माधवरावचा रंग ही कविता त्यांनी वयाच्या बाराव्या वर्षीच लिहिली. शिवरायांच्या स्वराज्यातील लढवय्ये बाजीप्रभू, तानाजी यांच्यावर त्यांनी पोवाडे लिहिले. त्यांच्या बहुतेक

कविता देशभक्तीपर आहेत. त्यांच्या कवितांनी मनामनात देशभक्ती गाजवली. सागरास सांत्वन बेडी, पहिला हसा, चांदोबा चांदोबा भागलास का? मूर्ती दुजी ती, माझे मृत्युपत्र, आत्मबळ, सायंघंटा अशा कवितांनी मराठी साहित्यात वेगळेच स्थान निर्माण केले.

गोव्याचे कवी बा. भ. बोरकर यांच्या संवेदनशील कवितांमधूनही राष्ट्रप्रेम आणि गुलामगिरीबद्दलची चीड प्रतिबिंबित होते. त्यांच्या महाराष्ट्र गीत, भगवती स्वतंत्रतेस, स्वातंत्र्यलक्ष्मीस, स्वातंत्र्याची सिंहगर्जना, या कवितेत स्वातंत्र्याचा ध्यास आणि हुतात्मांबद्दलचा आदर दिसतो. त्यांच्या कर माझे जुळती या वीरांना वंदन करणाऱ्या कवितेला तर सुभाषितांचे स्थान प्राप्त झालेले आहे. दिव्यत्वाची जेथ प्रचिती तेथे कर माझे जुळती। यज्ञी ज्यांनी देऊनी निजशिर। घडिले मानवतेचे मंदिर। परि जयांच्या दहनभूमीवर नाही चिरा नाही पणती।

या कवितेच्या ओळींनी प्रत्येकाच्या मनात स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या विरांबद्दल प्रेम निर्माण होते. कवी माधव काटदरे, अज्ञातवासी कुसुमाग्रज, सेनापती बापट, माधव जुलियन, कवी यशवंत, कवी अनिल, विं.दा. करंदीकर, वसंत बापट, कुंजविहारी, अमरशेख, अण्णाभाऊ साठे, गोविंद त्र्यंबक दरेकर आदि कवींनी आपल्या कवितांमधून ब्रिटिश राजवटीच्या विरोधात संताप व्यक्त केला. त्यामुळे या कवितांमधून जनजागृती घडून आली. सरकारने या कवितांवर बंदी आणून जप्त करून नष्ट करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यामुळे उलट या कवितांमधून जागविली गेलेली राष्ट्रभावना स्वातंत्र्यचळवळीच्या दृष्टीने अधिकाधिक प्रेरणादायी बनली.

केशवसुतांनी मराठी कवितेमध्ये सामाजिक क्रांतीच्या कविता प्रथमच लिहिल्या. केशवसुतांनी फ्रेंच राज्यक्रांतीने परिचित करून दिलेली स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही तत्वत्रयी आपल्या कवितेत स्वीकारली होती. ब्राह्मण नाही, हिंदूही नाही, न मी एक पंथाचा, असा पुकारा त्यांनी आपल्या नवा शिपाई या कवितेत केला आणि जिकडे जावे तिकडे माझी भावंडे आहेत असे सांगून टाकले होते. एका भारतीयाच्या उद्गारात आरंभीच देवा परवशपणाची निशा ही सरुन स्वातंत्र्याचा द्युमणि उद्या यावयाचा फिरुन या शब्दांनी स्वातंत्र्याचा विचारही त्यांनी स्पष्टपणे व्यक्त केला होता. तथापि त्यांच्या स्वातंत्र्य कल्पनेमध्ये रुढीपासून स्वातंत्र्य ही सामाजिक स्वातंत्र्याची कल्पनाच प्रभावी होती. या रूढी विरुद्ध बंडाचा झेंडा मिरविण्याचा विचार आपल्या स्फूर्ती या कवितेत त्यांनी जोरदारपणे मांडलेला आहे.

सावरकरांच्या कवितेमध्ये आज ज्याला राष्ट्रीय कविता असे नाव मिळाले आहे ती रचना प्रामुख्याने दिसून येते. "स्वातंत्र्यप्रीती आणि पारतंत्र्याबद्दल दुःख, पूर्व इतिहासामधील घटना, आणि व्यक्ती यांबद्दलचा अभिमान, नवीन पराक्रमाला उत्तेजन आणि त्याबद्दलचा आशीर्वाद इत्यादी तिचा विशेष आहे."४ आधुनिक कवी पंचकातील कवी विनायक यांनी या कवितेला प्रारंभ केला होताच. पुढे कवी माधव, कवी दु.आ. तिवारी, अज्ञातवासी कवी गोविंद इत्यादींनी ती परंपरा पुष्ट केली. कवी गोविंद यांना स्फूर्ती मिळाली ती सावरकरांकडून आणि त्यांची पहिली रचना झाली ती मेळयांमधील पदांच्या स्वरूपाची. पुढे आणखी त्याखेरीज इतरही काव्यरचना त्यांनी केली. परंतु विषय मात्र ठरलेला एकच राष्ट्रीय दृष्टीचा. तिवारींनी आपल्या मराठ्यांची संग्रामगीते, झाशीची संग्राम देवता, शिवप्रताप, राणा प्रतापसिंह इत्यादी काव्यांनी पुष्कळच भर घातली. राष्ट्रीय कवितेचा प्रसार सामान्य जनांपर्यंत पोहोचविण्याचे श्रेय त्यांना द्यावे लागेल. काव्यदृष्ट्या मात्र त्यामध्ये अर्थापेक्षा आवाज अधिक होता. कमी माधव यांची कविता सहजपणे यापेक्षा सरस आणि साक्षेपाची आहे. मराठ्यांच्या इतिहासातील काव्यानुकूल प्रसंग वेचून काढून ते कविताबद्ध करून कवी माधवांनी आपली शाहीरगिरी केली आहे. शाहिरांत नसलेला रचनेचा साक्षेप माधवांनी चांगला सांभाळला होता. "काव्य ही कला असून तिचा बोज राष्ट्रीय कविता लिहीत असतानाही राखावयास पाहिजे याकडे त्यांचे फार लक्ष असे."५ केशवसुतांनी काव्याचे प्रयोजन म्हणून पुष्कळच गोष्टी सांगितल्या आहेत. त्यात आशा, प्रेम आणि पराक्रम यांचे गायन, गतवैभव पुन्हा मिळविण्यात स्फुरण, पुढल्या पिढीस पूर्वजांच्या पराक्रमाची साक्ष इत्यादीचा समावेश आहे. नवकवितेने व्यक्ती स्वातंत्र्याबरोबर राष्ट्रीय स्वातंत्र्याचाही पुरस्कार केला. स्वातंत्र्यपूर्वकालात परकीय राज्य, पारतंत्र्याचे दुःख, स्वातंत्र्याची दुर्दम्य इच्छा, ऐतिहासिक कालाबद्दलचे प्रेम व आकर्षण या गोष्टी काव्यात प्रतिबिंबित होत होत्या. स्वातंत्र्याच्या आगमनाच्या वेळी याबद्दलचा आनंद व्यक्त झाल्यावर मात्र हे विषय कवितेच्या प्रांतात साहजिकच येईनासे झाले. त्याऐवजी सामाजिक परिस्थितीलाच महत्त्व मिळून ती मधील अन्याय व विषमता यासंबंधीची कवींची प्रतिक्रिया मात्र उत्कटपणे व्यक्त होऊ लागली. कवी केशवसुतांच्या अनेक गाजलेल्या कवितांनी स्वातंत्र्यचळवळीला बळ दिले. त्यांना आधुनिक मराठी कवितेचे जनक असे म्हटले जाते. आपल्या कवितांतून त्यांनी सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केलेला दिसून येतो. आपल्या तुतारी या कवितेत ते म्हणतात,

रुढी, जुलूम यांची भेसूर, संताने राक्षसी तुम्हाला।

फाडूनी खाती हतबेला, जल्शाची का? पुसा मनाला।
तुतारीने ह्या सावध व्हा तर।

आपल्या 'नवा शिपाई' 'स्फूर्ती', 'मूर्तिभंजन' 'गोफण केली व्हान', 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न', 'मजुरावर उपासमारीची पाळी', एका भारतीयाचे उद्गार अशा कवितांमधून केशवसुतांनी असंतोष जागवला. तसेच सामाजिक ऐक्याचा पुरस्कार केला.

१८८५ मध्ये राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. यातून एक सामाजिक राजकीय चळवळ स्पष्ट होऊ लागली. राजकीय की आधी समाज सुधारणा या द्वंद्वातून प्रतिपक्ष निर्माण झाले. केसरी, सुधारक या दोन वृत्तपत्रांतून या विचारसरणी प्रकट होत होत्या. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात होत असलेल्या उद्बोधनपर खळबळीपासून कवी जीवन अलिप्त राहणे शक्य नव्हते. म्हणूनच केशवसुतांनी ही सर्वच राजकीय सामाजिक आंदोलने त्यांच्या तंत्रज्ञानासह आपल्या प्रतिभेने कवितेच्या कवेत घेतलेली दिसतात. १९२० नंतर सुरू झालेल्या राजकीय संघर्षाला सार्वत्रिकतेचा पाया होता. खेड्यापाड्यातील शेतकरी शेतमजूर आणि बहुजन समाजातून हा संघर्ष चेतविण्याचे ऐतिहासिक कार्य महात्मा गांधींकडून घडले होते. स्वातंत्र्यलढा हा या टप्प्यावर खऱ्या अर्थाने जनसामान्याद्वारे लढला आणि लढविला जात होता. सर्वसामान्य माणूस हाच या लढ्यातील खरा सैनिक आहे आणि त्याची शक्ती हीच खरी राष्ट्रशक्ती आहे. ते 'आगगाडी आणि जमीन' 'अहिनकुल' इत्यादी कवितांतून व्यक्त झाले. सामान्य माणूस एकदा का पेटून उठला तर त्याच्या शक्तीसमोर मदमत्त राजसत्ता धडाधड कोसळून पडायला वेळ लागत नसतो ही जाणीव रुजवण्याचा प्रयत्न कुसुमाग्रजांनी केला. तत्कालीन कालखंडाशी सुसंगत अशी ही क्रांतीचा घोष करणारी कविता लिहून कुसुमाग्रजांनी आपले ऐतिहासिक कार्यात पार पाडले असे म्हटले पाहिजे.

पारतंत्र्य आणि स्वातंत्र्य या दोन्ही कालखंडात शाहीर अमरशेखांनी काव्यलेखन केले होते. मी १९३० सालापासून गीत व पोवाडे लिहित आलो असे स्वतः अमरशेखांनी म्हटले आहे. म्हणजे रविकिरण मंडळाच्या कालखंडापासून अमरशेखांची काव्य निर्मिती सुरू होते. अमर शेखांसारख्या समाजमनस्क कवीने स्वातंत्रपूर्व कालखंडात गुलामगिरी विरुद्ध जनजागरण घडविण्यासाठी गीत पोवाडा लिहिणे अगदी स्वाभाविक गोष्ट होती. या कालखंडात, "देशांमध्ये सामाजिक आणि राजकीय पातळीवर जे प्रचंड संघर्ष झाले जी परिवर्तने घडवून आली त्या सर्वांना अमरशेख साक्षी राहिले. त्यातून अमरशेखांना प्रेरणा मिळाली नसेल तर नवल.

त्यामुळे स्वातंत्र्याच्या लढ्यात अमरशेखांची वाणी प्राणपणाने सामील झाली होती."६

विशाखा या काव्यसंग्रहात कवी कुसुमाग्रज अन्नत्याग करुन मृत्यूच्या दारात पाऊल टाकताना राजबंद्यांच्या ओठावर असलेले गाणे क्रांतीचा जयजयकार या कवितेत अशी मांडणी करतात की,

"गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार,
अन वज्रांचे छातीवरती घ्या झेलून प्रहार!
खळखळू द्या या अद्यशृंखला हातापायांत,
पोलादाची काय तमा मरणाच्या दारात?
सर्पांनो उद्दाम, आवळा कसूनिया पाश,
पिचेल मनगट परि उरातिल अभंग आवेश,
तडिताघाते कोसळेल का तारांचा संभार,
कधीही तारांचा संभार,
गर्जा जयजयकार, क्रांतीचा गर्जा जयजयकार!"७

तर जालियनवाला बाग या हत्याकांडाचे विदारक चित्र आपल्या कवितेत मांडताना ते असे म्हणतात की,

"पाचोळ्यापरी पडली पाहून प्रेतांची रास,
नयन झाकले असशील देवा, तू अपुले खास,
असेल ही वा सैतानाची प्रभूवरी मात,
एक जखम अन नवीन येशू, तुझ्या काळजात."८

संदर्भ टिपा

१. उमेश उजगरे (संपा.), योजना विकास समर्पित मासिक, अंक १, ऑगस्ट २०२२. पृ.३९.

२. रा. श्री. जोग, (संपा.), मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पाचवा, भाग एक, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, प्रथमावृत्ती, १९७३, पृ.३०६.

३. सुधाकर शेलार, एकोणिसावे शतकः सुधारणावाद व मराठी साहित्य, स्वरूप प्रकाशन, प्रथमावृत्ती २००८, पृ. ४०.

४. रा.श्री. जोग, प्रदक्षिणा, खंड पहिला, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पाचवी आवृत्ती, १९७२, पृ. ३०.

५. कित्ता, पृ.३०.

६. मनोज तायडे, नारायण सुर्वे यांच्या कविता आणि काव्यदृष्टी, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, सप्टेंबर २००५, पृ. ५३.

७. कुसुमाग्रज, विशाखा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९४२, पृ.४६.

८. कित्ता पृ. ४७.

९. गं. ना. जोगळेकर, मराठी वाङ्मयाचा अभिनव इतिहास इसवी सन १८००-१९२०स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस द्वितीयावृत्ती, ऑगस्ट १९९५.